# हमीपत्राचा नमूना

**(राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरीता शिधापत्रिकाधारकाने शासन निर्णय क्रमांक:- असुका-२०२१/प्र.क्र. ६५ /ना.पु.२२, दि. १५ सप्टेंबर, २०२१ अन्वये करावयाचे हमीपत्र)**

मी श्री./श्रीमती.........................................Mr/Mrs..............................................................(कुटुंब प्रमुखाचे मराठी व इंग्रजीतील (CAPITAL LETTERS मध्ये) आधार कार्डाप्रमाणे संपूर्ण नाव) ($) राहणार ............................................................ ...................................................................................... (पूर्ण पत्ता) असे प्रमाणित करतो/ करते की, सद्यस्थितीत मी अंत्योदय अन्न योजना/ प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थी या प्रकाराची शिधापत्रिका धारण करीत असून (शिधापत्रिका क्रमांक) / शिधापत्रिकेची नव्याने मागणी करीत असून मला याकरिता विहीत केलेल्या कमाल वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादेची जाणीव आहे. माझ्या कुटुंबाचे गतवर्षाचे वार्षिक उत्पन्न ₹ ........ /- (अक्षरी रुपये ..................................... फक्त) असल्याबाबत (तपशील खालीलप्रमाणे) मी कुटुंबप्रमुख या नात्याने सदर माहिती सादर करीत आहे.

| अ.क्र. | संपूर्ण नाव (प्रत्येक सदस्याचे संपूर्ण नाव अनिवार्य) | वय | लिंग | कुटुंब प्रमुखाशी नाते | सदस्याचे वार्षिक उत्पन्न | आधार क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | कुटुंब प्रमुख स्वत: | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ३ पेक्षा अधिक सदस्यसंख्या असल्यास हमीपत्र तयार करताना त्यांची नावे येथे समाविष्ट करावीत | | | | | | |
| | | | एकूण वार्षिक कौटुंबिक उत्पन्न | | | |

मी असेही नमूद करतो / करते की, मी अथवा माझ्या कुटुंबातील सदस्याचे नाव देशातील इतर कोणत्याही शिधापत्रिकेमध्ये अंतर्भूत नाही.

दी महाराष्ट्र फूडग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर, १९६६ व दी महाराष्ट्र शेड्यूल्ड कमोडीटीज (रेग्यूलेशन ऑफ डीस्ट्रीब्यूशन) ऑर्डर, १९७५ अन्वये खोटी अथवा चूकीची माहिती देण्यास प्रतिबंध असल्याची मला जाणीव आहे. उपरोक्त माहिती चुकीची आढळून आल्यास अथवा माझ्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नामध्ये यापुढे बदल होऊन मी उपरोक्त शिधापत्रिका धारण करण्यास अपात्र ठरत असल्यास आणि माझ्या कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेली घट संबंधित शिधावाटप प्राधिकाऱ्यास कळविण्याची दक्षता न घेतल्यास मी भारतीय दंड संहितेतील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र राहीन, याची मला कल्पना आहे व ती भोगण्यास मी तयार आहे.

सदर हमीपत्र “कुटुंब प्रमुख” या नात्याने मी माझ्या कुटुंबाच्या वतीने करीत असून ते कोणत्याही दबावाखाली करीत नाही. सदर हमीपत्र मी माझी सद्सद् विवेकबुध्दी जागृत ठेऊन व नशापाणी न करता करीत आहे. सदर माहिती चुकीची ठरवून माझी शिधापत्रिका रद्द करण्यात आल्यास मी महाराष्ट्र शासनास जबाबदार धरणार नाही. तसेच शासनाच्या या कृत्याबाबत मी अथवा माझ्या कुटुंबातील अन्य सदस्य यांची भविष्यात काहीही हरकत असणार नाही.

तरी मला व वर नमूद केलेल्या माझ्या कुटुंबातील माझ्यासोबत वास्तव्य करीत असलेल्या सदस्यांना कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेनुसार अनुज्ञेय शिधापत्रिका देण्यात यावी / अनुज्ञेय असलेली माझी विद्यमान शिधापत्रिका पुढे सुरु ठेवण्यात यावी व आम्हास देय सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात यावा.

सोबत:- १. कुटुंबातील सर्व सदस्यांच्या (उपलब्ध असलेल्या) आधार कार्डांची झेरॉक्स प्रत
२. जुन्या शिधापत्रिकेच्या (असल्यास ) प्रथम व अंतिम पृष्ठाची स्वप्रमाणित प्रत

स्वाक्षरी :-
कुटुंब प्रमुखाचे नाव :-
दिनांक :-

*टिप:- $ राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम १३ नुसार कुटुंब प्रमुख म्हणून निश्चित केलेली कुटुंबातील व्यक्ती*